Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – III May - June 2023

# माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी श्रवण दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रम एक अभ्यास

**डॉ. करण राठोड**
*मार्गदर्शक*
*पी. व्ही. डी. टी. कॉलेज ऑफ एड्युकेशन फॉर वुमेन, चर्चगेट, मुंबई*

**संतराम महादेव पवार**
*संशोधक*
*पी. व्ही. डी. टी. कॉलेज ऑफ एड्युकेशन फॉर वुमेन, चर्चगेट, मुंबई*

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे सर्वांना समान संधी निर्माण करणे व ती उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्रमुख कर्तव्य आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मानवाचा सर्वांगीण विकास साधला जातो. समाजामध्ये काही वंचित घटक असे असतात की त्यांना शिक्षण घेता येत नाही अशामध्ये दिव्यांग मुले यांचा समावेश होतो. सर्व शिक्षा अभियान २००९ व राष्ट्रीय दिव्यांग अधिनियम २०१६ अंतर्गत दिव्यांगांना सर्वसाधारण मुला सारखेच व त्या मुला बरोबरच शिक्षण देणे हे प्रमुख ध्येय मानले आहे.दिव्यांग मुलांना शोधून त्यांच्या कुवतीनुसार त्यांना प्रगती करून घेण्याची संधी देणे हे महत्वाचे  पाहिजे.

दिव्यांगता ही जन्मजात किंवा अपघातामुळे निर्माण होत असते. पालकांना किंवा मुलांना आपल्या चुकीमुळे हे दिव्यांगतत्व आले आहे  हे स्वीकारणं फारच जड जाते. यात दोष कोणाचा नसलातरी अशा दिव्यांग मुलांना मात्र असंख्य अडचणी व समस्यां1ना तोंड देऊन जगावे लागते.

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**समावेशक शिक्षणाची गरज**

श्रवण दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी  सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबत शिकण्याची संधी मिळेल.सर्वसामान्य मुलांच्या मनात तुझा भाव निर्माण होणार नाही किंवा दिव्यांग मुलांबाबत त्यांना प्रेम आपुलकी वाटेल या दृष्टीने विचार करून सर्वसामान्य मुलांना सोबत दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्याची वेगवेगळे कौशल्य सुधारण्यासाठी उपयोग होईल.

सर्वसामान्य शाळेमध्ये विशेष गरज असणारी विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्यांना आपण वेगळे आहोत किंवा आपल्या मध्ये काही गोष्टीची कमतरता आहे याची जाणीव होणार नाही. तसेच त्यांना सर्वसामान्य मुलांसोबत शिकण्याची संधी मिळेल. तसेच त्यांना आपण वेगळे नाहीत.याची भावना वाढीस लागेल.

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना समावेशक शिक्षणाची सुविधा पुरवणे सोयीचे होईल.तसेच शैक्षणिक संसाधनाचा उपक्रमांचा व कृतींचा त्यांना सर्वसामान्य मुलांसोबत लाभ घेता येईल. विशेष गरजा आधारे विद्यार्थ्यांना केवळ विशेष सेवांवर अवलंबून राहून जगावे लागणार नाही.समावेशकता तेव्हाच राखली जाईल, जेव्हा गटातील किंवा वर्गातील सर्व विद्यार्थी एखाद्या खेळात सामुदायिक सामुहिक उपक्रमात सहभागी

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – III May - June 2023

होऊ शकतील.जेणेकरून त्यात सर्व विद्यार्थ्यांचा विचार केला जाईल.

**संशोधनाची गरज**

श्रवण ऐकून मानवी विकासात खूप महत्वाची भूमिका असते. श्रवणशक्तीपासून वंचित असलेली एखादी व्यक्ती वस्तू आणि वास्तवाच्या घटनेविषयी पूर्ण आणि सर्वसमावेशक कल्पना तयार करण्यासाठी, आपल्या सभोवतालच्या जगाच्या पूर्ण माहितीसाठी महत्त्वपूर्ण असे ध्वनी संकेत समजण्यास अक्षम आहे. गंभीर विकारांमध्ये, एखादी व्यक्ती ऐकण्याच्या व्यक्तीसाठी बनवलेल्या माहितीचे बरेच स्त्रोत वापरू शकत नाही, दूरदर्शनवरील कार्यक्रम, चित्रपट आणि नाट्यविषयक कामगिरीची सामग्री पूर्णपणे जाणू शकत नाही.

एखाद्या व्यक्तीच्या बोलण्यात प्रभुत्व मिळविण्यामध्ये ऐकण्याची भूमिका विशेषतः महत्त्वाची असते. यामुळे, लोकांशी संवाद साधण्याची शक्यता तीव्रतेने मर्यादित आहे आणि म्हणूनच, संज्ञान, माहिती प्रसारित करण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे तोंडी भाषण. भाषणाची अनुपस्थिती किंवा अविकसितपणा यामधून इतर संज्ञानात्मक प्रक्रियेच्या विकासात आणि मुख्यतः शाब्दिक-तार्किक विचारांच्या उल्लंघनाकडे वळते. प्राथमिक दोष म्हणून सतत ऐकण्याची कमतरता यामुळे दुय्यम विकासाचे विकार उद्भवू शकतात ज्यामुळे दोन्ही संज्ञानात्मक क्रियाकलाप आणि संपूर्ण मुलाचे व्यक्तिमत्व प्रभावित होते.

**समस्या विधान**

मुंबई उपनगर मधील माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी श्रवण दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रम एक अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. मुंबई उपनगर मधील माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी श्रवण दिव्यांगता विषयक साक्षरते संबंधित संकल्पना, समजूती, विचार व आवश्यकता यांचा अभ्यास करणे.
२. मुंबई उपनगर मधील श्रवणदिव्यांगता विषयक साक्षरतेच्या स्तराचे निश्चितीकरण करण्यासाठी दिव्यांग आता विषयक साक्षरता कार्यक्रम चे विकसन करणे.
३. मुंबई उपनगर मधील श्रवण दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन व शासकीय योजनांची माहितीची जाणीव जागृती करणे.

**संशोधनाची चले**

१. स्वाश्रयी चल - माध्यमिक स्तरावर कार्य करणारे शिक्षक.
२. आश्रयी चल - (परतंत्र चल) श्रवण दिव्यांगता विषयक साक्षरता कार्यक्रम

**कार्यात्मक व्याख्या**

१. माध्यमिक शाळा - १०+२+३या आराखड्यानुसार माध्यमिक शाळा या प्राथमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळांच्या मधील शिक्षण पुरविणाऱ्या शाळा. भारतात सहसा ५ वी ते १०वी इयत्तेच्या शाळा माध्यमिक शाळा गणल्या जातात.
२. शिक्षक - विषय त्याच्या क्षमतेनुसार शिकवणारा.
३. श्रवण : अर्थपूर्ण ऐकणे म्हणजे श्रवण होय. (मराठी शब्दकोश) श्रवण म्हणजे कानाच्या सहाय्याने ऐकून त्याचा अर्थ लावणे.

**गृहितके**

सर्वसाधारण शाळेतील माध्यमिक शिक्षकांना श्रवण दिव्यांगता संदर्भात शास्त्रीय माहिती, अध्यापन पद्धती इत्यादी विषयी माहिती आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

१ सदर संशोधनात लक्षात येणाऱ्या दृश्य दिव्यांगता असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार आहे.

२ सदर संशोधनात दिव्यांग व्यक्तीचा अधिकार २०१६ तील दिव्यांगत्व प्रकारातील फक्त श्रवण दिव्यांग या एकाच प्रकारचा विचार केला जाणार आहे.

३ सदर संशोधनात श्रवण दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रम त असणार आहे.

४ प्रस्तुत संशोधनात मुंबई उपनगर मधील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या श्रवण विकलांगता साक्षरतेविषयी विचार केला जाणार आहे.

५ सदर संशोधनात अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण दिव्यांगता संस्था मधील श्रवण दिव्यांगता विषयक कार्यक्रमाचा संदर्भ घेतला जाणार आहे.

**संशोधनाची मर्यादा**

१ प्रस्तुत संशोधन मुंबई व उपनगर विभागातील शाळेतील शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.

२ श्रवण दिव्यांगता विषयक सर्वसाधारण मुलांच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे साक्षरता संवर्धना पुरतेच मर्यादित आहे.

३ दिव्यांग व्यक्तीचा अधिकार २०१६ यातील फक्त दृश्य दिव्यांगत्व असणाऱ्या श्रवण दिव्यांगा पुरताच मर्यादित आहे.

**संशोधन महत्व**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांनादिव्यांग विद्यार्थी त्यांच्या समस्या, एकात्मिक व समावेशीत शिक्षण इत्यादी विषयी माहिती असणे आवश्यक आहे.अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण दिव्यांग संस्था श्रवण दिव्यांग विद्यार्थीबालके व इतर श्रवण दिव्यांग यांच्यावर उपचार करणे आधुनिक तंत्र युक्त साधने निर्मिती करणे दिव्यांग तत्त्वांच्या शिक्षणासाठी प्राथमिक माध्यमिक उच्च शिक्षण पदवी व पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन यावर कार्य करणाऱ्या संस्थेची माहिती असणे अत्यावश्यक आहे.

सदर संशोधन विषय हा नवीन असल्याचे पाहण्यास मिळते त्यामुळे जुने नवीन साहित्याचे परिक्षण करणे व त्यातून संशोधन संदर्भ संशोधकाला दिव्यांगता,श्रवण दिव्यंगता त्यांची लक्षणे,समस्या, त्यांच्या अध्ययन अध्यापन पद्धती,आधुनिक तंत्रज्ञान(ITC)साधने,विषयक साक्षरता करण्यासाठी शैक्षणिक संस्था महत्त्वाची भूमिका निभावत असल्याचे पाहण्यात येते त्यामुळे याची सुरुवात शैक्षणिक संस्थांमधून केली पाहिजे असे संशोधकांना वाटते. शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील मुख्य घटक आहे त्या शिक्षकांनाच जर या दिव्यांगता संदर्भात माहिती व प्रशिक्षण दिले तर दिव्यांगांचे सर्वसाधारण बालका बरोबर एकात्मिक शिक्षण प्रक्रिया व्यवस्थित पार पडू शकते म्हणून संशोधकाने सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे .

**संबधित संशोधन साहित्याचा आढावाभारतीय संशोधन**

१ कोमल दीप कौर आणि सुनीता मॅग्गो 2014शिक्षणात श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी तोंड दिलेली शिकवण्याची रणनीती आणि आव्हाने

१. हा शोधनिबंध भारतातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या श्रवण-अशक्त विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक पद्धतीने शिकवण्याच्या दृष्टीकोनांचा अभ्यास करतो.

**२** बागूल विद्यायदेवी भिला.समावेशीत शाळेतील शिक्षकांकरिता दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकसन आणि परिणामकारकतेचा अभ्यास २०२१.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

**विषय -** विलासपूर येथील समावेशित एकात्मिक आणि विशेष शाळेत करण्यात आलेला अभ्यास

**उद्दिष्टे**

१ समावेशित शिक्षक एकात्मिक शिक्षक आणि विशेष शाळेतील शिक्षकांच्या संवेदनशीलतेचे विश्लेषण करणे

२ समावेशित शिक्षणासंदर्भातील दृष्टिकोन अभ्यासणे

३ समावेशित शिक्षणात शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती - सर्वेक्षण पद्धती**प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती जमा केली

**निष्कर्ष**


१. अभ्यासांती असे दिसून आले की 65% शिक्षकांना योग्य पद्धतीने समावेशित शिक्षणाची आणि एकात्मिक शिक्षणाची संकल्पना माहिती आहे.

२. सेवांतर्गत शिक्षकांपेक्षा सेवापूर्व समावेशित शिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या अंगी समावेशित शिक्षणासाठी लागणाऱ्या क्षमता अधिक आहेत सिंह 2017.इंदलकर एन इंदलकर एस 2017

**नमुना निवड**

न्यादर्श लोकसंख्या - १५०सदर संशोधनात संशोधकाने मुंबई उपनगर मधील माध्यमिक विभागातील १५०शिक्षकांची संख्या ही लोकसंख्या ठरवलेली आहे.

**माहिती विश्लेषण**




आकृती वृत्तालेख


**अर्थनिर्वचन -**

१. अशा कर्णबधीर मुलांसाठी विशेष एकल शाळेत मुलांनी प्रवेश घेण्यासंदर्भा६८.६ %शिक्षक सहमत आहेत.
२. २२ % शिक्षक एकल विशेष शाळेत प्रवेश घेणे संदर्भात असहमत आहेत.
३. ६% शिक्षक काहीप्रमानात काही प्रमाणात सहमत नाहीत.
४. ५.३% शिक्षक काहीप्रमानात सहमत आहेत.

**चर्चा -**

**एकल विशेष शाळेत** विशेष शिक्षक,साधने व सर्व सोयी असतात. सर्वसमावेशक वर्गात आशा सोयी उपलब्ध नसतात. तसेच शिक्षकांना असे प्रशिक्षण नसल्याने शिक्षक एकल विशेष शाळेत प्रवेश घेण्यासंदर्भात सहमत दर्शवितात.

असहमत दर्शविणारे शिक्षक काही प्रमाणात असहमती दर्शवितात.एकल विशेष वर्गापेक्षा सर्वसामान्य विद्यार्थांच्या बरोबर दिव्यांग मुलांचा विकास लवकर होतो म्हणुन सामान्य शाळांनी योग्य त्या सोयी उपलब्ध करून दिल्या आणि शिक्षकांनी स्वयंप्रेरणेने अध्यापन केल्यास दिव्यांग मुलांसाठी ते उपयुक्त ठरेल.




आकृती वृत्तालेख

**अर्थनिर्वचन -**

१. ९४.१ % शिक्षक अशा पद्धतीच्या प्रशिक्षणाद्वारे आणि समाजातील तज्ञ शिक्षक अधिकारी विश्लेषक वैद्यकीय अधिकारी इत्यादींशी संपर्क ठेवून श्रवण दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कार्य करण्यासंदर्भात सहमती दर्शवतात.
२. १% शिक्षक गरज नाही असे सांगतात.
३. ४.९% सांगता येत नाही असे सांगतात.

**चर्चा व निष्कर्ष-**

१. समवेशी वर्गात अध्यापन करताना शिक्षकांना श्रवण विकलांगते बाबत माहिती घेण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते.

२. शारीरिक,मानसिक,भावनिक समस्या समजून घेतल्या अध्यापन करताना योग्य पद्धती निवडता येतात.
३. प्रशासकीय कामकाजबाबत सोयी,सवलती,नाव नवीन कार्यपद्धती माहीत करून घेण्यासाठी प्रशासनाशी संपर्क ठेवणे.

**निष्कर्ष**

१. कर्णबधीर विद्यार्थ्यांचे सर्वसामान्य विद्यार्थ्यांबरोबर समावेशक पद्धतीने अध्यापन करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेण्याची तयारी शिक्षकांनी दाखवतात.
२. वर्ग व्यवस्थापनामध्ये भौतिक साधनांचे रचना परिणामकारकपणे करण्याचे महत्त्व शिक्षकांना समजले आहे.
३. विकलांगतेचे प्रमाण,प्रकार,रचना,दोष व त्यावरील उपाय यांची माहिती झाली.
४. शासनाच्या विविध योजना माहीत करून घेऊन त्याचा दिव्यांगांना फायदा करून देण्यासाठी संप्रेषण कौशल्य प्राप्त करतात.
५. पालक व श्रवण विकलांग विद्यार्थी मानसिकरित्या खचलेले असतात अशावेळी शिक्षकांना समुपदेशन करतात.
६. शासन आर्थिक,वैद्यकीय,व प्रवास खर्च याची पूर्तता करते परंतु शिक्षकांना अशा सवलती बाबत माहिती करून घेतात.
७. दिव्यंगता सर्टिफिकेट उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे परंतु त्यातील जाचक अटी असल्याने पालक प्रयत्न करत नाहीत म्हणुन शिक्षक मार्गदर्शन करतात.
८. प्रत्येक शिक्षकांना अध्ययन अध्यापन मूल्यमापन या दैनंदिन क्रिया पार पाडत असतानाच अशा विशेष विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी मदत मिळवतात.
९. सामाजिक कार्यकर्ते, मोठमोठ्या संस्था, कंपन्या व परदेशी दानशूर व्यक्ती यांच्याशी संपर्क साधून आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी सवलती साधने उपलब्ध करून घेण्यासाठी शिक्षकप्रभावी संभाषण कौशल्य आत्मसात करतात.

**शिक्षकांसाठी शिफारसी**

१. श्रवण दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक असणारे ज्ञान,तंत्रज्ञान,अध्ययन अध्यापन पद्धती इत्यादी साठी प्रशिक्षण घ्यावे.
२. शिक्षक म्हणून अशा श्रवण दिव्यांग विद्यार्थ्याकडे विशेष आपुलकीने व प्रेमाने वर्तन करावे.
३. समुपदेशन व संप्रेषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेण्याची तयारी ठेवावी.
४. शिक्षकांनी सामाजिक आणि नैतिक जबाबदारी म्हणून श्रवण दिव्यांग मुलांच्या प्रगती साठी अशा संस्थांना भेटी देणे आवश्यक आहे.
५. प्रशासकीय कामकाजाबाबत, सोयी, सवलती, नवनवीन कार्यपद्धती माहीत करून घेण्याबाबत शिक्षकानी प्रशासनाशी संपर्क ठेवावा.

**शाळाव्यवस्थापणसमितीसाठीशिफारसी**

१. समावेशक पद्धतीने श्रवण दिव्यांग मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व मानवी व भौतिक साधनांची उपलब्धता करावी.
२. वर्ग व्यवस्थापनामध्ये बैठक व्यवस्था,आवश्यक असणारे उपकरणे व शालेय वर्गाची रचना शास्त्रीय पद्धतीने करावी.

**शासन,शालेय शिक्षण विभाग, राष्ट्रीय व राज्यशिक्षण व प्रशिक्षण परिषद यांच्याकडे शिफारसी.**

१. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण कायद्यानुसार अंमलबजावणी करत असताना प्रत्येक शिक्षकांना प्रगत ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी ठराविक कालावधीमध्ये प्रशिक्षणाची सोय करावी.
२. अशा विकलांग विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापनाच्या व परीक्षांच्या पद्धतीमध्ये सुधारणा करावी.
३. शालेय प्रवेश, उच्च शिक्षण व नोकरी यामध्ये अशा श्रवण दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव जागेचे धोरण ठरवावे.
४. श्रवणविकलांग विद्यार्थी आणि सामान्य विद्यार्थी असा फरक न करता सर्वसामावेशी पद्धती मध्ये विशेष शिक्षकाची ऐवजी सामान्य माध्यमिक शाळेतील शिक्षकांना आशा प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज आहे.

**पुढील संशोधनाचे विषय**

१. मुंबई मधील एकात्मिक शिक्षणातील आव्हाने स्थिती एक अभ्यास.
२. मुंबई मधील कर्ण बधिर शाळांचीस्थिति,गरजा व उपाय यांचा अभ्यास.
३. नॅशनल लायब्ररी बांद्रा मुंबई मधील शैक्षिक उपक्रमांचा अभ्यास.

**संदर्भ ग्रंथ**

१. इंदलकर एन इंदलकर साळुंखे के आणि काळे एस 2017 समावेशित शिक्षण, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
२. अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र शैक्षणिक अक्षमता असलेली बालके ओम मुद्रणालय मुंबई.
३. कुलीद 2013 संख्याशास्त्रीय तोंड ओळख तेज पब्लिकेशन्स नवी दिल्ली .
४. नांदेड जि.विशेष गरजा असलेल्या बालकांचे.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे
५. बालकांचा मोफत व शक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 - 2019 मुंबई शालेय क्रीडा विभाग मंत्रालय महाराष्ट्र शासन